**स्थायी निदेश क्र.२१**

**नगरपालिका आस्थापनेवर दि.१०.०३.१००३ नंतरच्या नियमबाहय नियुक्त्या/ रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र. ३६५/०३/५,**
**दिनांक : १५ जानेवारी २००४**

वाचा :- १) स्थायी निदेश क्र. ४ - आदेश क्र. सीओडी-१२०/प्र.क्र.१२१/२०००/२, दि.३१.८.२०००
२) या कार्यालयाचे पत्र क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र. ३६८/०३/५, दि. ३ जानेवारी २००४

शासनाने दि. १०.३.१९९३ पुर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना आदेशाच्या दिनांकापासून नियमित सेवेत घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. या कर्मचाऱ्यांची मागील सेवा, सेवा विषयक किंवा आर्थिक लाभासाठी ग्राहय धरलेली नाही. दि. ११.३.१९९३ ते दि. २७.३.२००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. तथापि अलिबाग नगरपरिषदेने शासनाच्या किंवा या कार्यालयाच्या आदेशाशिवाय दि. १०.३.१९९३ नंतरच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना मंजूर रिक्त पदावर सामावून घेण्याची नियमबाहय कृती केली आहे. असा प्रकार इतरही नगरपरिषदांमध्ये असण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा अनियमित नियुक्त्यांमुळे अपात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती / वय / शैक्षणिक पात्रतेचा अभाव असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व त्यामुळे सेवाभरती नियमांना येत असलेली बाधा विचारात घेऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ नुसार संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार अनियमित नियुक्त्या संदर्भात कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे नगरपरिषदांना निर्देश देण्यत येत आहेत.

१) दि.११.३.१९९३ ते २७.३.२००० पुर्वी नियुक्त केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत कायम वेतनश्रेणीमध्ये नियुक्ती देऊ नये. या कर्मचाऱ्यांची नगरपरिषदेस आवश्यकता असलयास त्यांना रोजंदारीवर ठेवण्यात यावे आणि त्याप्रमाणे मंजूर पद रिक्त ठेवण्यात यावे.

२) दि. २८.३.२००० नंतरच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना कमी करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.नप्रसंई - १००३/ प्र. क्र. ३६८/०३/५, दि. ३ जानेवारी २००४ अन्वये स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) दि.१०.३.१९९३ नंतर नियुक्त केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांनी कायम सेवेत नियुक्ती देण्याबाबत नगरपरिषदे विरुध्द न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणामध्ये शासनाचे धोरण न्यायालयामध्ये स्पष्टपणे सादर करण्यात यावे व न्यायालयाचा निर्णय नगरपरिषदेच्या बाजूने लागण्यासाठी मुख्याधिकारी यांनी स्वत: प्रयत्नशिल रहावे. तसेच नगरपरिषदे विरुध्द न्यायालयाने संबधित कर्मचाऱ्याना सेवेतून कमी करु नये असे आदेश दिले असल्यास अशा सेवकास रोजंदारीवरच सेवेत ठेवले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

४) शासनाच्या वरील सर्वसामान्य धोरणाविरुध्द जर कोणत्याही न्यायालयाने नगरपरिषदे विरुध्द आदेश दिले असल्यास अशा प्रकरणामध्ये योग्य त्या ठिकाणी त्या आदेशाविरुध्द अपील केले जाईल आणि अपीलामध्ये योग्य त्या वकीलामार्फत नगरपरिषदेच्या वतीने न्यायालयासमोर शासनाची आणि नगरपरिषदेची भूमिका स्पष्ट केली जाते त्यासाठी मुख्याधिकारी स्वत: जबाबदार राहतात. जर अशा आदेशा विरुध्द वेळेवर अपील करण्यात आले नाही किंवा न्यायालयासमोर पुरेशी काळजी घेवून नगरपरिषदेच्या वतीने योग्यरित्या मुद्दे मांडण्यात आले नाही असे निदर्शनास आल्यास याबाबत मुख्याधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

नगरपरिषदांनी कामगारांच्या (रोजंदारी/मानधन/ठेका पध्दत) सेवा संपुष्टात आणल्यास आणि सेवा संपुष्टात आणण्याच्या प्रक्रियेत विहित नियमांचा / पध्दतीचा अवलंब झाला नसल्यास न्यायालय नगरपरिषदेची कृती नियमबाहय ठरवितात. अशा प्रकरणी मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याऐवजी सदरील प्रकरण नव्याने चालू करुन प्रचलित अधिनियम / नियम व विहित पध्दतीचा अवलंब करुन तसेच औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील तरतुदींचा वापर करुन संबंधीतांच्या सेवा संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.

५) वरील मुद्या क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही न केल्यास मुख्याधिकारी व्यक्तीश: जबाबदार असतील व अशा नेमणूकांच्या वेतनावरील खर्च मलकापूर नगरपरिषदेची याचिका क्र. ६४०/९७ मधील मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या मार्गदर्शक निर्णयानुसार नियमबाहय नेमणूकांना जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून अतिप्रदान झालेल्या रक्कमांची वसुली करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६) ज्या नगरपरिषदांमध्ये दि.१०.३.१९९३ नंतरच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना मंजूर रिक्त पदावर सामावून घेण्याची कार्यवाही झालेली आहे त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी / पदाधिकाऱ्यांची नावे तसेच त्यांना प्रदान झालेल्या एकूण रकमेबाबतची माहिती मुख्याधिकारी यांनी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना सादर करावी. या कार्यालयाचे पत्र क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र. ३६८/०३/५, दि. ३ जानेवारी २००४ प्रमाणे विभगीय आयुक्त कार्यालयांनी या प्रकरणामध्ये कार्यवाही करावयाची आहे व त्रैमासिक बैठकांमध्ये त्याबाबत आढावा घ्यावयाचा आहे.

७) नगरपरिषदेने स्थायी / अस्थायी रिक्त पदावर नियमबाहय नियुक्त्या केल्या असतील तर अशा नियुक्त्या तात्काळ संपुष्टात आणून अशा कर्मचाऱ्यास मूळ पदावर आणण्याची मुख्याधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

८) तसेच अशा नियुक्त्यांमुळे झालेल्या अनियमित खर्चाची वसुली संबंधितांकडून करुन घेणेसाठी तसा प्रस्ताव या संचालनालयाकडील पत्र क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र. ३६८/०३/५, दि. ३ जानेवारी २००४ मधील तरतुदीनुसार आयुक्त व प्रादेशिक संचालकांकडे सादर करणेत यावा.

उपरोक्त निदेशाचे परिषदेपुढे वाचन करणेत यावे व तशी सभा कार्यवृतांतात नोंद घेण्यात यावी.

(सुनील सोनी)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) मुख्याधिकारी (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगरे जिल्हा वगळून)
३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, (सर्व)
४) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय (सर्व)
५) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.